सत्यमेव जयते
Government of Maharashtra
महाराष्ट्र शासन

# छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा

कार्यालयाचा ई-मेल-deangmcsatara7@gmail.com | कार्यालय दुरध्वनी 02162-299763

जा.क्र.शावैमसा/ग्रंथा/ नियतकालिक खरेदी/ 03 /2026 | दि. 22/01/2026

**Website Open Quotation Notice.**

## महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरुन नियतकालिकांच्या दरपत्रकाचे प्रसिध्दी पत्रक

प्रति,

विषय :- सन २०२६ या दिनदर्शिका वर्षाकरीता जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीकरीता वैद्यकीय शास्त्रातील भारतीय व परकीय प्रकाशकाच्या छापील नियतकालिकांची वर्गणी (Print Journals Subscription) (रक्कम) भरण्याकरीता/ पुरवठा करण्याकरीता दरपत्रके सादर करण्याबाबत...

मा. महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास विनंती करण्यात येते की, सन २०२६ या दिनदर्शिका वर्षाकरीता जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीकरीता छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागासाठी आवश्यक असलेल्या भारतीय व परकीय प्रकाशकाच्या नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) भरावयाची आहे.

या पत्राव्दारे आपणास सूचित करण्यात येते की, नियतकालिकांची वर्गणी भरण्याबाबतचे दरपत्रक भरण्यापूर्वी, या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागाने सदर दरपत्रकाच्या पत्रामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीचे प्रथम काळजीपूर्वक अवलोकन करुन, नियतकालिक पुरवठादारांनी (आपण) आपले मोहरबंद दरपत्रक माननीय अधिष्ठाता, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा यांच्या नावे सादर करावेत.

नियतकालिके पुरवठादारांचे (आपले) सदरील दरपत्रक या महाविद्यालयाने खाली नमुद केलेल्या अटी, शर्तीनुसार सादर करण्यात आले नाहीत तर, त्या नियतकालिके पुरवठादाराचे (आपले) दरपत्रक पुढील प्रक्रियेसाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

| दरपत्रके पाठविण्याचा पत्ता : | दरपत्रके या कार्यालयास पोहचविण्याचा कालावधी : |
|---|---|
| माननीय अधिष्ठाता,<br>छत्रपती संभाजी महाराज शासकीय<br>वैद्यकीय महाविद्यालय, सदर बझार,सातारा.<br>415001 | दि.22.01.2026 ते 29.01.2026 सायंकाळी 05.00 पर्यंत. |

ग्रंथपाल
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मध्यवर्ती ग्रंथालय
छ.सं.म.शा.वै.म.सातारा

(डॉ. विनायक काळे)
अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रुग्णालय,सातारा

पा. 1...7

आपले दरपत्रक खालील स्वरुपातच सादर करावे.

| Sr. No. | Subject | ISSN | Name of the Journals | Current Volume publish in year | No. of Issues scheduled year | Publisher and place | Frequency / Periodicity | (Indian / Foreign) | Print/print + online | Price for Print Only | Price for Print + online | Publisher Price in Respective Currency (MRP) | Currency | Conversion Rate | Discount in percentage | Publishers Net price in respective currency | Net Price in Indian Rupees. | Indexed In |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | |

**महत्वाची अट - नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) भरण्याकरीता/पुरवठा करण्याकरीता नियतकालिक पुरवठादारास (आपणास) आदेश दिल्यास नियतकालिकांच्या देयकाची रक्कम या' महाविद्यालयाकडून शासकीय निधी उपलब्धतेनुसार अदा करण्यात येईल.**

- नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) संबंधित प्रकाशकास भरण्याकरीताचे दरपत्रक खालील अटी व शर्तीनुसार या महाविद्यालयास सादर करण्यात यावे.

१) आपणास जर नियतकालिक पुरवठ्याचे आदेश दिल्यास देयकासोबत नियतकालिकांच्या किंमती. नियतकालिकाचा खंड, प्रकाशन वर्ष इत्यादी बाबींच्या माहितीकरीता पुरावे सादर करणे गरजेचे असल्यामुळे, नियतकालिक पुरवठादार (आपण) या महाविद्यालयास देयक (बिल) सादर करताना देयकासोबत त्या-त्या नियतकालिकांच्या, त्या-त्या प्रकाशकाचे प्राईज प्रुफ, बँक रेमिन्टन्स चेकची छायांकित प्रत, प्रकाशकाचा प्राईज प्रुफ देयकासोबत सादर करणे अनिवार्य आहे. (नियतकालिक पुरवठादाराने स्वतःच्या लेटरहेडवर प्राईज प्रुफ तयार न करता, किंवा ॲमेझॉन, फ्लीपकार्ट यासारख्या साईटवरील ऑनलाईन प्राईज प्रुफ सादर न करता, संबंधित प्रकाशकांचे प्राईज प्रुफ सादर करणे अनिवार्य आहे.)

२) जर नियतकालिके पुरवठादाराचे (आपले) दरपत्रक स्विकृत झाल्यास, या महाविद्यालयाकडून नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) संबंधित प्रकाशकास भरण्याकरीता आपणास आदेश देण्यात आल्यास या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या अटी, शर्तीनुसार, या महाविद्यालयाच्या नावे नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) प्रकाशकास

ग्रंथपाल
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मध्यवर्ती ग्रंथालय
छ.सं.म.शा.वै.म.सातारा

(डॉ. विनायक काळे)
अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रुग्णालय सातारा

2....7

भरताना ज्या बँकेमार्फत भरण्यात आली ती पावती/रीसीटची, तसेच PUBLISHER INVOICE COPY (पब्लीशर इनव्हाईस कॉपी/देयक/बील) ची, तसेच या महाविद्यालयाच्या नावे नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) प्रकाशकास भरल्यानंतर संबंधित प्रकाशकाकडून आपणास प्राप्त होणारी पोहोच PUBLISHER PAYMENT RECEIPT (पब्लीशर पेमेंट रोसीट) ची एक छायांकित प्रत HARD COPY स्वरुपात या महाविद्यालयास सादर करणे नियतकालिका पुरवठादारावर (आपणावर) बंधनकारक/अनिवार्य राहील.

३) जर एखाद्या नियतकालिकांचा सुट्टा अंक, विहीत कालावधीत प्राप्त न झाल्यास, नियतकालिकांच्या वर्गणीबाबत (रक्कमेबाबत), सबसिक्रप्शन/आय.डी. नंबरबाबत नियतकालिक पुरवठादार (आपण), या संस्थेच्या नावाने संबंधीत प्रकाशकास जो काही पत्रव्यवहार, ई-मेल, इत्यादीव्दारे कराल, ती इत्यंभूत माहिती, तसेच प्रस्तुत प्रकरणी त्याबाबत संबंधित प्रकाशकाने उलट टपाली आपणास सदर नियतकालिकांच्या सुट्ट्या अंकाबाबत जो काही पत्रव्यवहार, ई-मेल, इत्यादी बाबींची माहिती सादर करण्यात येत असेल किंवा करणार, त्या सर्व माहितीच्या छायांकित प्रती/ई-मेल या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास सादर करणे नियतकालिके पुरवठादारावर (आपणावर) बंधनकारक राहील.

४) सन २०२६ या दिनदर्शिका वर्षाच्या (जाने. २०२६ ते डिसें. २०२६ या कालावधीकरीताच्या) नियतकालिकांच्या पुरवठ्याचा हिशोब माहे फेब्रुवारी, २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करणे नियतकालिक पुरवठादारावर (आपणावर) बंधनकारक असेल.

५) या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास आवश्यक असलेल्या नियतकालिकांच्या पुरवठ्याच्या हिशोबाबावत मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या दृष्टीने नियतकालिकांच्या एकूण आदेशाच्या ५% सुरक्षा अनामत रक्कम म्हणून बँक गॅरंटी या महाविद्यालयाच्या नावे सन जाने. २०२६ ते डिसें. २०२६ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी द्यावी लागेल. तसेच सदरील रक्कमेची बँक गॅरंटी राष्ट्रीयकृत बँकेची (Nationalised Bank) असणे बंधनकारक असून या महाविद्यालयास जमा करणे आवश्यक आहे.

६) या महाविद्यालयाच्या नावाने प्रकाशकास वर्गणी (रक्कम) भरल्यानंतर संस्थेच्या नावे असलेला सबस्क्रिशन/आय.डी. नंबर, मध्यवर्ती ग्रंथालय विभागास त्वरीत सादर करणे नियतकालिक पुरवठादारावर (आपणावर) बंधनकारक आहे.

७) या महाविद्यालयाकडून घेतलेली नियतकालिकांची वर्गणी (रक्कम), नियतकालिकांच्या त्या- त्या प्रकाशकास सदरील नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) नियतकालिक पुरवठादाराने (आपण) केंव्हा भरली, त्याबाबत पाठपुरावा करण्याकरीता प्रस्तुत प्रकरणी त्या-त्या नियतकालिकाच्या प्रकाशकाचा ई-मेल आय.डी., पूर्ण नाव व पत्ता, दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादीची माहिती या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास सादर करणे नियतकालिक पुरवठादारावर (आपणावर) बंधनकारक आहे.

ग्रंथपाल
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मध्यवर्ती ग्रंथालय
छ.सं.म.शा.वै.म.सातारा

(डॉ. विनायक काळे)
अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रुग्णालय,सातारा

८) या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास आवश्यक असलेल्या नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) भरण्याकरीता नियतकालिक पुरवठादारास (आपणास) आदेश दिल्यानंतर आपण संबंधीत त्या-त्या प्रकाशकाकडे नियतकालिकांचे सुट्टे अंक प्राप्त करुन घेण्यासाठी, या महाविद्यालयाच्या नावाने प्रस्तुत प्रकरणी पत्रव्यवहार/ई-मेल करणे आपणावर बंधनकारक असून, प्रस्तुत प्रकरणीच्या अधिक माहितीकरीता मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या अधिकृत ई-मेल आय.डी. वर प्रस्तुत पत्रव्यवहाराची/ई-मेलची एक प्रत किंवा ई-मेलची सीसी करणे आवश्यक आहे.

९) या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास आवश्यक असलेल्या नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) संबंधित प्रकाशकास या महाविद्यालयाच्या/संस्थेच्या नावाने भरणे व संबंधित प्रकाशकाकडून वर्गणी (रक्कम) मिळाल्याबातची पोहोच घेणे आवश्यक आहे.

१०) नियतकालिक पुरवठादारास (आपणास) थकीत देयकावर कोणत्याही स्वरुपाचे व्याज अदा करण्यात येणार नाही.

११) या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या यांच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने नियतकालिक पुरवठादारास नियतकालिकांची वर्गणी प्रकाशकास भरण्याकरीता/पुरवठा करण्याकरीताचे आदेश दिल्यानंतर, नियतकालिकांच्या पुरवठ्या संबंधित., नियतकालिक पुरवठादारास रु. ५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त) रुपयांच्या मुद्रांक कागदावर (स्टॅम्प पेपरवर) हमीपत्र/करारपत्र देयकासोबत सादर करणे नियतकालिक पुरवठादारावर (आपणावर) बंधनकारक आहे.

१२) नियतकालिक पुरवठादार यांच्या फर्मची (आपली) जीएसटीबाबतची शासनाकडे नोंदणी असलेल्या प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.

१३) या महाविद्यालयास मोहरबंद दरपत्रक (Sealed Quotation )सदर करताना/पाठवताना पाकिटावर / लिफाफ्यावर प्रति, " मा. अधिष्ठाता, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा " असा ठळक अक्षरात पत्ता नमुद करावा. तसेच मोहरबंद लिफाफ्यावर "सन २०२६ या दिनदर्शिका वर्षाकरीता नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) भरण्याकरीताचे दरपत्रक" असे ठळक अक्षरात नमुद करावे. सदरहु मोहरबंद दरपत्रक या कार्यालयास दि.२९.०१.२०२६ रोजीपर्यंत संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोच करावे. तद्नंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१४) सदरचे दरपत्रक भारतीय डाक सेवेमार्फत किंवा हस्तबटवड्याने किंवा कुरीयर सेवेमार्फत दि. २९.०१.२०२६ रोजीपर्यंत संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी महाविद्यालयाच्या कार्यालयात प्राप्त झाल्यास आपले दरपत्रक ग्राह्य धरले जाईल. अन्यथा तद्नंतर प्राप्त झाल्यास आपले दरपत्रक तुलनात्मक तक्त्यासाठी विचारात घेतले जाणार नाही.

ग्रंथपाल
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मध्यवर्ती ग्रंथालय
छ.सं.म.शा.वै.म.सातारा

(डॉ. विनायक काळे)
अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रुग्णालय,सातारा

4....7

१५) कोणत्याही नियतकालिक पुरवठादाराचे या महाविद्यालयास ई-मेलव्दारे पाठविण्यात / सादर करण्यात आलेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

---

**दरपत्रकासोबत खालील नमुद केलेल्या मुद्यान्वये आवश्यक ते कागदपत्र / दस्तऐवजांच्या छायांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे.**

१) गुड ऑफिसेस कमिटी (G.O.C), नवी दिल्ली यांचे अधिकृत सन २०२५-२६ या वर्षाकरीता सभासद असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

२) पॅनकार्डची छायांकित प्रत. तसेच जे नियतकालिक पुरवठादार या पत्रात नमुद केल्याप्रमाणे अटी, शर्तीनुसार सदरचे दरपत्रक या महाविद्यालयास सादर करणार आहेत. त्यांच्या पॅनकार्डची छायांकित प्रत दरपत्रकासोबत सादर करणे अनिवार्य असल्यामुळे, ज्यांचे पॅनकार्ड फर्मच्या नावे नसेल, त्यांनी ज्यांच्या नावे पॅनकार्ड आहे, त्यांचे व फर्म यांचेबाबत आवश्यक असणारी दस्तऐवज दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

३) मागील सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या (Assessment Year २०२६-२७) कालावधीचे आयकर परतावा/निपटारा विवरणपत्र/प्रमाणपत्र (Income Tax Return Acknowledgement) ची छायांकित प्रत.

४) पुस्तक खरेदीबाबत व नियतकालिकांची वर्गणी भरण्याबाबत, गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली यांचे अटी, शर्ती असलेले तसेच नियतकालिकांचा अधिकृत/मान्यताप्राप्त पुरवठादारांची यादी असलेल्या माहे डिसेंबर २०२५ / माहे जानेवारी २०२६ च्या संपूर्ण परिपत्रकाची प्रत.

५) जीएसटी बाबतची शासनाकडे नोंदणी असलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

६) भागीदार/संचालक मंडळाचे पॅनकार्ड, फोन नंबर सहीत पूर्ण पत्ता व ई-मेल आय.डी. इत्यादी बाबतची माहिती असलेली प्रत.

७) प्रस्तुत प्रकरणी ज्या बँकेमार्फत व्यवहार केला जातो किंवा करणार आहे. त्या बँकेचे नाव आणि पूर्ण पत्ता व ई-मेल आय.डी. सह माहिती किंवा इतंभुत माहिती असलेली प्रत.

८) वाचनसाहित्याची (नियतकालिक/पुस्तक) आयात-निर्यात बाबतची व दुकाने व आस्थापना / नोकरी व सेवा शर्तीचे नियमबाबतचे प्रमाणपत्र तसेच प्रस्तुत प्रकरणी इतर आवश्यक असणाऱ्या प्रमाणपत्राची प्रत.

१०) इतर कागदपत्र.

---

ग्रंथपाल
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मध्यवर्ती ग्रंथालय
छ.सं.म.शा.वै.म.सातारा

(डॉ. विनायक काळे)
अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रूग्णालय,सातारा

6....7

वर नमुद केल्याप्रमाणे या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या अटी, शर्तीच्या अनुषंगाने, सन २०२६ या कॅलेंडर वर्षाच्या (जाने. २०२६ ते डिसें. २०२६ या कालावधीकरीताच्या) नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) संबंधित प्रकाशकास भरण्याकरीता या महाविद्यालयाचे आदेश मिळविण्याकरीता / सदस्यत्वाकरीता, खालील मुद्यासमोर नियतकालिक पुरवठादाराने (आपण) आपल्या काही अटी/शर्ती असल्यास मुद्येनिहाय स्पष्टपणे दरपत्रकामध्ये नमुद करण्यात याव्यात.

१) नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) भारतीय व परकीय प्रकाशकास भरण्याबाबत.

२) प्रकाशकाने नियतकालिकांची किंमत सन २०२६ या कॅलेंडर वर्षाकरीता प्रकाशीत केल्यानंतर, प्रकाशकाने मध्येच किंमत वाढवली तर, किंवा इतर बाबीकरीता पुरवणी देयकाबाबत.

३) या महाविद्यालयास आवश्यक असलेल्या नियतकालिकांची वर्गणी भरण्याकरीता आपणारा आदेश दिल्यास, व प्रकाशकाने सन २०२६ या कॅलेंडर वर्षाकरीताच्या नियतकालिकांची किंमत प्रकाशीत केली नसल्यास त्याबाबत.

४) नियतकालिकांचे सुट्टे अंक हाताळणीकरीता, भारतीय डाक सेवेमार्फत (पोस्टाने), किंवा परकीय प्रकाशकाची नियतकालिकांचे सुट्टे अंक कुरीअर सेवेमार्फत या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागात पोहोच करण्याकरीताच्या शुल्क आकारणीबाबत.

५) नियतकालिकांचे सुट्टे अंक भरतीय डाक सेवेमार्फत (पोस्टात) अथवा कुरीअर सेवेमार्फत किंवा प्रकाशकाने पुरवठा न केल्यास, त्या गहाळ झालेल्या सुट्ट्या अंकाबाबत.

६) या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागामध्ये जर वर्षभरामध्ये एखाद्या नियतकालिकांच्या सुट्टया अंकाचा एकही अंक प्राप्त न झाल्यास, त्या नियतकालिकांबाबत किंवा जे अंक प्राप्त झालेले नसतील किंवा नाहीत त्याबाबत.

या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास आवश्यक असलेल्या नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) प्रकाशकास भरण्याकरीता, नियतकालिक पुरवठादारास (आपणास) आदेश दिल्यास, एकूण आदेशाच्या ५% सुरक्षा अनामत रक्कम म्हणून बँक गॅरंटी या महाविद्यालयाच्या नावे दोन वर्षाच्या कालावधीसाठी द्यावी लागेल. व सदरील नियतकालिकाच्या सुट्टया अंकाचा पुरवठा जर विहित कालावधीमध्ये पूर्ण न झाल्यास. किंवा अन्य कारणास्तव पुरवठा न झाल्यास किंवा या महाविद्यालयाच्या नावे संबंधित प्रकाशकास नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) न भरल्यास, नियतकालिकांच्या एकूण आदेशाच्या ५% रक्कम सुरक्षा अनामत म्हणून जी बँक गॅरंटी या महाविद्यालयाकडे जमा करण्यात आलेली आहे. ती सर्व ५% बँक गॅरंटीची रक्कम दंडात्मक कारवाई म्हणून कपात करण्यात येईल.

७) नियतकालिकांच्या पुरवठ्याबाबत/वितरणाबाबत.

ग्रंथपाल
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मध्यवर्ती ग्रंथालय
छ.सं.म.शा.वै.म.सातारा

(डॉ. विनायक काळे)
अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रूग्णालय,सातारा

८) नियतकालिकांच्या पुरवठ्याबाबत या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास भेट (व्हिजीट) देणेबाबत किंवा इतर सेवा देण्याबाबत.

९) या महाविद्यालयास आवश्यक असणाऱ्या नियतकालिकांच्या पुरवठ्याचे आदेश दिल्यानंतर सबस्क्रिप्शन आय.डी. बाबत/प्रकाशकास वर्गणी (रक्कम /पैसे) दिल्याबाबत बैंक रेमिन्टन्स तसेच आपणाकडून या महाविद्यालयाच्या नावे नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) मिळाल्याबाबत संबंधित प्रकाशकाने आपणास दिलेली/मिळालेली पोहोचबाबत.

१०) या महाविद्यालयाने आपणास नियतकालिक पुरवठ्याचे आदेश दिल्यानंतर नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) संबंधित प्रकाशकास भरलेली आहे किंवा नाही, त्याकरीता संबंधीत प्रकाशकाचा ई-मेल आय. डी. तसेच प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेला पत्रव्यवहार (ई-मेल) व संबंधित प्रकाशकाकडून या महाविद्यालयाच्या नावे आपणास करण्यात आलेला पत्रव्यवहार (ई-मेल) इत्यादीबाबत.

११) वर नमुद केलेल्या या महाविद्यालयातील मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या अनु.क्र. १ ते १२ बाबत यांच्या नियतकालिक पुरवठ्याच्या संपूर्ण अटी, शर्तीबाबत.

१२) वर नमुद केलेल्या अटी व शर्ती व्यतीरिक्त, नियतकालिक पुरवठादाराच्या (आपल्या) अजून काही इतर अटी, शर्ती असल्याबाबत.

* आपण सादर केलेले दरपत्रक स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार खाली स्वाक्षरी करणार मा. अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहेत.

डॉ. विनायक काळे

अधिष्ठाता

छत्रपती संभाजी महाराज शासकीय

वैद्यकीय महाविद्यालय, सातारा

सोबत: नियतकालिकांची यादी

(डॉ. विनायक काळे)
अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रुग्णालय, सातारा

वर्ष २०२६ करिता आवश्यक नियतकालिकांची यादी

| Sr. No | Subject | Name of the Journal |
|---|---|---|
| 1 | SURGERY | Jama Surgery |
| 2 | SURGERY | Annals of Surgery |
| 3 | SURGERY | Journal of Surgery |
| 4 | SURGERY | Journal of Neurology Neurosurgery and Psychiatry |
| 5 | SURGERY | Clinical Plasma Medicine |
| 6 | SURGERY | Journal of Heart and Lung Transplantation |
| 7 | SURGERY | American Journal of Transplantation |
| 8 | SURGERY | Journal of Emergency Surgery |
| 9 | SURGERY | Journal of Neurointerventional Surgery |
| 10 | SURGERY | Journal of Thoracic and Cardiovascular Surgery |
| 11 | SURGERY | Asian journal of surgery |
| 12 | SURGERY | Digestive surgery |
| 13 | SURGERY | Journal of Gl surgery |
| 14 | SURGERY | Journal of breast surgery |
| 15 | Pharmacology | Journal of Pharmacology & Experimental Therapeutics |
| 16 | Pharmacology | DRUGS |
| 17 | Pharmacology | National Journal of Physiology, Pharmacy & Pharmacology |
| 18 | Pharmacology | Annual Review of Pharmacology & Toxicology |
| 19 | Community Medicine | Indian Journal of Community Medicine |
| 20 | Community Medicine | Indian Journal of Public Health |
| 21 | Community Medicine | Bulletin of World Health Organization |
| 22 | Microbiology | JCM – Journal of Clinical Microbiology |
| 23 | Microbiology | IJSS – Indian Journal of Scientific study |
| 24 | Microbiology | Journal of Medical Mycology |
| 25 | Microbiology | Journal of Patient Safety and Infection control |
| 26 | Microbiology | Indian Journal of pathology & Microbiology |
| 27 | Microbiology | IJSR – Indian Journal of scientific research |
| 28 | Microbiology | Indian Journal of Tuberculosis |
| 29 | Biochemistry | Journal of Clinical and Diagnostic Research |
| 30 | Biochemistry | Indian Journal of Clinical Biochemistry |
| 31 | Biochemistry | Journal Of Endocriolonogy |

ग्रंथपाल
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मध्यवर्ती ग्रंथालय
छ.सं.म.शा.वै.म.सातारा

| Sr. No | Subject | Name of the Journal |
|---|---|---|
| 32 | Obstetrics & Gynaecology | Journal of Obstetrics & Gynaecology of India |
| 33 | Obstetrics & Gynaecology | Obstetrics & Gynaecology Survey |
| 34 | Obstetrics & Gynaecology | Obstetrics & Gynaecology Clinics of North America |
| 35 | Obstetrics & Gynaecology | Clinical Obstetrics & Gynaecology |
| 36 | Obstetrics & Gynaecology | British journal of Obstetrics & Gynaecology |
| 37 | Obstetrics & Gynaecology | Contraception |
| 38 | Obstetrics & Gynaecology | International Journal Obstetrics & Gynaecology |
| 39 | Obstetrics & Gynaecology | Obstetrics & Gynaecology |
| 40 | Obstetrics & Gynaecology | International Society of Ultrasound in Obstretics and Gynaecology |
| 41 | Ophthalmology | All India Ophthalmological Society (AIOS) |
| 42 | Ophthalmology | Journal Of Ophthalmology & Clinical Research (JOCR) |
| 43 | Ophthalmology | British Journal Of Ophthalmology |
| 44 | Ophthalmology | Ophthalmology Retina |
| 45 | Ophthalmology | American Journal of Ophthalmology |
| 46 | Anaesthesia | Indian Journals of Anaesthesia |
| 47 | Anaesthesia | Journal of Anaesthesiology and Clinical Pharmacology |
| 48 | Anaesthesia | British Journal of Anaesthesia |
| 49 | Anaesthesia | Regional Anaesthesia and Pain Medicine |
| 50 | Dental | Indian Journal of Dental Research |
| 51 | Dental | Journal of Indian Dental Association (JIDA) |
| 52 | Dental | Clinical Dentistry |
| 53 | Dental | Indian Journal of Dentistry |
| 54 | Dental | Journal of Contemporary Dentistry |
| 55 | Dental | Indian Journal of Contemporary Dentistry |
| 56 | Dental | IP Indian Journal of Orthodontics and Dentofacial Research |
| 57 | Dental | Journal of Indian Society of Pedodontics and Preventive Dentistry |
| 58 | Physiology | Journal of applied Physiology |
| 59 | Physiology | Acta Physiologica |
| 60 | Physiology | Physiological reviews |
| 61 | Physiology | The Circulation |
| 62 | Physiology | Journal of education technology in health sciences |
| 63 | Physiology | Advances in physiology Education |
| 64 | Physiology | Indian Journal of physiology and pharmacology |

ग्रंथपाल
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मध्यवर्ती ग्रंथालय
छ.सं.म.शा.वै.म.सातारा

| Sr. No | Subject | Name of the Journal |
|---|---|---|
| 65 | Dermatology | Indian Journal of Dermatology, Venerology and Leprology |
| 66 | Dermatology | Indian Journal of Dermatology |
| 67 | Dermatology | Indian Journal of Leprosy |
| 68 | Dermatology | Indian Journal of Sexually transmitted Diseases and AIDS |
| 69 | Dermatology | International Journal of Dermatology |
| 70 | Dermatology | International Journal of Leprosy |
| 71 | Dermatology | Leprosy Review |
| 72 | Dermatology | Archieves of Dermatology |
| 73 | Dermatology | British Journal of Dermatology |
| 74 | Dermatology | Journal of American Academy of Dermatology |
| 75 | Dermatology | Dermatologic Surgery |
| 76 | Pediatrics | Indian Journal of Pediatrics |
| 77 | Pediatrics | Indian Journal of Practical Pediatrics |
| 78 | Pediatrics | Indian Pediatrics |
| 79 | Pediatrics | Peadiatrics |
| 80 | Pathology | British Journal of Haematology |
| 81 | Pathology | CANCER, International journal of American Cancer Society |
| 82 | Pathology | Journal of Clinical Pathology |
| 83 | Pathology | Haematology/Oncology Clinics of North America |
| 84 | Pathology | American Journal of Surgical Pathology |
| 85 | Pathology | Indian Journal of Pathology & Microbiology |
| 86 | Pathology | Indian Journal of Cancer |
| 87 | Pathology | LANCET |
| 88 | Pathology | I.C.M.R. Bulletin |
| 89 | Pathology | Histopathology, journal of the British Division of the International Academy of Pathology |

ग्रंथपाल
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मध्यवर्ती ग्रंथालय
छ.सं.म.शा.वै.म.सातारा

| Sr. No | Subject | Name of the Journal |
|---|---|---|
| 90 | Pathology | Acta Cytologica, The Journal of Clinical Cytology and Cytopathology |
| 91 | Pathology | Archives of Pathology and Laboratory Medicine-Published by American Medical Association |
| 92 | Pathology | Human Pathology- Published by W.B. Saunders & Company |
| 93 | Pathology | American Journal of Clinical Pathology |
| 94 | Pathology | Indian Journal of Cytology |
| 95 | Pathology | WHO Bulletin |
| 96 | Pathology | Indian Journal of Urology |
| 97 | Pathology | Modern Pathology |
| 98 | Pathology | Indian journal of Leprosy |
| 99 | Pathology | New England Journal of Medicine |
| 100 | Aatomy | Journal Of Anatomical society Of India |
| 101 | Aatomy | National Journal Of Clinical Anatomy |
| 102 | Aatomy | Med Plus International Journal Of Anatomy |
| 103 | Aatomy | Journal Of Aatomy (Wiley Publication) |
| 104 | FMT | Journal of Indian Academy of Forensic Medicine |
| 105 | FMT | Journal of Forensic Medicine, Science and Law |
| 106 | FMT | Journal of Forensic Medicine and Toxicology |
| 107 | FMT | Medico Legal Update |
| 108 | FMT | Journal of Indian Society of Toxicology |
| 109 | FMT | International Journal of Legal Medicine |
| 110 | FMT | The American Journal of Forensic Medicine and Pathology |
| 111 | FMT | Medicine, Science and the Law |
| 112 | FMT | Medico-Legal Journal |
| 113 | FMT | Forensic Science International |

ग्रंथपाल
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मध्यवर्ती ग्रंथालय
छ.सं.म.शा.वै.म.सातारा

| Sr. No | Subject | Name of the Journal |
|---|---|---|
| 114 | ENT | Indian Drugs Journal |
| 115 | ENT | Indian Journal of Anatomy & Surgery of Head, Neck & Brain |
| 116 | ENT | Indian Journal of Medical Ethics |
| 117 | ENT | Indian Journal of Otolaryngology and Head and Neck Surgery |
| 118 | ENT | Indian Journal of Otology |
| 119 | ENT | American Journal of Otolaryngology and Head and Neck Surgery |
| 120 | ENT | Journal of Oral & Maxillofacial Pathology |
| 121 | ENT | Otology & Neurotology (AMERICAN NEUROOTOLOGY SOCIETY) |
| 122 | ENT | Journal of Otolaryngology-Head & Neck Surgery (BMC) |
| 123 | ENT | Clinical Otolaryngology (WILEY) |
| 124 | ENT | Journal of Otolaryngology-Head & Neck Surgery |
| 125 | Psychiatry | Indian Psychiatric Society |
| 126 | Psychiatry | Indian Journal of Clinical Psychology |
| 127 | Psychiatry | Indian Journal of Psychological Medicine |
| 128 | Psychiatry | Journal of Indian Association for Child and Adolescent Mental Health |
| 129 | Psychiatry | Indian Journal of Psychiatry |
| 130 | Psychiatry | British Journal of Psychiatry |

ग्रंथपाल
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मध्यवर्ती ग्रंथालय
छ.सं.म.शा.वै.म.सातारा